AvianMedia

**Navshakti**
**Thursday, September 17th, 2009 (Mumbai)**
**Page No- 12**

# हरभजन 'निओ स्पोर्ट्‌स'चा 'ब्रँड ॲम्बेसेडर'

**क्रीडा प्रतिनिधी**

मुंबई, बुधवार- 'निओ स्पोर्ट्‌स ब्रॉडकॉस्ट प्रायव्हेट लिमिटेड'ने आघाडीचा क्रिकेटपटू हरभजन सिंगची 'ब्रँड ॲम्बेसेडर'म्हणून नियुक्ती केली आहे. निओ क्रिकेटवर होणाऱ्या क्रिकेट सामन्यांचा प्रसार करण्याची जबाबदारी हरभजनवर असेल.

हरभजननेही या नियुक्तीबद्दल आनंद व्यक्त केला. 'निओ स्पोर्ट्‌स'बरोबर ब्रँड ॲम्बेसेडरम्हणून नाते जोडताना मला आनंद होत आहे. आमचा दोघांचा एकच ध्यास आहे तो म्हणजे क्रिकेट. प्रत्येक भारतीय चाहत्याच्या घरी ही वाहिनी क्रिकेट पोहचवते. या वाहिनीवरील क्रिकेटच्या मोसमाचा प्रसार करत असताना भारतातील क्रिकेटवेड्या चाहत्यांपर्यंत पोहचण्याचे एक माध्यम होत असल्याचा मला आनंद होत असल्याचे हरभजनने सांगितले.

या वाहिनीवरील कार्यक्रम, ऑन ग्राऊंड आयोजने आणि वाहिनीवरील 'ऑन एअर' कार्यक्रमांमध्ये हरभजनचा सहभाग असेल. आमच्या वाहिनीसाठी ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून हरभजनसिंगसारख्या प्रगल्भ क्रिकेटपटूची गरज होती असे 'निओ स्पोर्ट्‌स ब्रॉडकॉस्ट प्रायव्हेट लिमिटेड'च्या विपणन आणि जनसंपर्क विभागाचे प्रमुख अभिषेक वर्मा यांनी सांगितले.